# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक १८.०४.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–**

दिनांक १७.०४.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ०३ ईसमांवर कारवाई करून एकुण ३,१८०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०९ ईसमांवर कारवाई करून एकुण ३,९४०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,७७३ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,८४,२००/–रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आली असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा, अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :– एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर – एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक १८.०४.२०२६ चे ०३.४० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना बिडीपेठ रोड, सोनझारी नगर, सोळंकीवाडी कडे जाणारा रोडवर एका सिल्व्हर रंगाचे बिना नंबर असलेल्या व्हेस्पा मोपेड वरील इसम जातांना दिसल्याने त्याचेवर संशय आल्याने, त्याचा पाठलाग करून त्यास सोळंकीवाडी, अजित सोळंकी यांचे घरासमोरील खाली प्लॉटवर थांबविले. पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव, प्रथमेश विलास सोळंकी वय २३ वर्षे रा. सोळंकीवाडी, जुना सक्करदरा, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे उजवे खिशात एका झिपलॉक पन्नीत ५१ ग्रॅम एम.डी. पावडर किंमती अंदाजे २,५५,०००/– रू. ची मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन नमुद एम.डी. पावडर, रोख ४०,०००/–रू., एक पोको कंपनीचा मोबाईल फोन, एक विना नंबरची व्हेस्पा मोपेड गाडी, एक इलेक्ट्रानिक वजनकाटा व आधार कार्ड असा एकुण ३,६५,५००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीची सखोल विचारपूस केली असता, त्याने नमुद एमडी पावडर त्याचा साथीदार पाहिजे आरोपी साहिल महेश सोळंकी वय ३० वर्षे रा. रामेश्वरी, नागपुर याचेकडुन विक्री करनेकरीता खरेदी केल्याचे सांगितले. आरोपी याने पाहिजे आरोपी याचेसोबत संगनमत करून, स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता

बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे सक्करदरा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव सक्करदरा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शानाखाली, पोनि. गजानन गुल्हाने, सपोनि संदीप जाधव, पोउपनि. नागेश पुन्नावाड, पोहवा अरविंद गेडेकर, विवेक आढाऊ, पोअं. देवचंद थोटे, अनुराग बांते, मपोहवा अनुप यादव, मपोअ. पायल यादव व प्रियंका सरोदे यांनी केली.

(गुन्हे)

**<u>१) पोलीस ठाणे सदर :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपी विरुध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १८.०४.२०२६ चे ०१.४० वा. चे सुमारास, सदर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, लाल शाळेच्या मैदानात, गड्डीगोदाम, नागपूर येथे गोवंशीय जनावरांना बांधून ठेवलेले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी जावुन पाहणी केली असता, शाळेच्या आतील मैदानात एकणू ११ गोवंशीय जनावरे यांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवलेले मिळुन आले. नमुद जनावरांचा मालकाबाबत माहिती काढली असता, माहिती मिळाली नाही. अज्ञात आरोपींनी गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या कत्तलीकरीता बांधुन ठेवल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळाहुन एकुण ११ गोवंशीय जनावरे एकुण किंमती अंदाजे १,९५,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरे यांना गौरक्षण केंद्र, धंतोली, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे. पोलीस ठाणे सदर येथे पोहवा मोहनसिंग ठाकूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीविरूध्द कलम ५,५(ब),९,९(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ३,११(१) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६० सहकलम ११८,११९ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. अज्ञात आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे शांतीनगर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १४.०४.२०२६ चे ०६.३० वा. ते दिनांक १७.०४.२०२६ चे ०९.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीत, फ्लॅट नं. बी—२, राज हाईटस्, नयापुरा हायस्कुलजवळ, नागपूर येथे राहणारे हातीम तमीम दलाल वय ३० वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह अमरावती येथे नातेवाईकाकडे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरुममधील लोखंडी आलमारीमधील रोख १,००,०००/— रु. तसेच सोन्या—चांदीचे दागिने असा एकूण २,५७,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे शांतीनगर येथे पोउपनि. आवाळे ९३७०९८९८४० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे बजाजनगर :— आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादीची आई नामे श्रीमती रेश्मा शशिकांत रेवतकर वय ५१ वर्षे यांचे पतीसोबत पटत नसल्याने सन २०१९ मध्ये त्याचा घटस्फोट झालेला होता. तेव्हापासून त्या प्लॉट क्र. २०२, सुरेश अपार्टमेंट, तात्या टोपे नगर, बजाजनगर, नागपूर येथे त्यांचा मित्र (आरोपी) नामे शशांक ज्ञानेश्वर गजभिये वय ४६ वर्ष रा. खडगाव रोड, सोनबानगर, म्हॉडा कॉलनी, वाडी, नागपूर याचेसोबत राहत होत्या. आरोपी हा फिर्यादीची आई हिचे चारित्र्यावर संशय घेऊन तिला नेहमी त्रास देऊन, मारहाण करुन, शारीरीक व मानसिक त्रास देत होता. दिनांक ०९.०४.२६ रोजी सुध्दा आरोपीने फिर्यादीचे आईला मारहाण करुन त्रास दिल्याने, आरोपीचे जाचाला कंटाळुन फिर्यादीचे आईने दिनांक १०.०४.२०२६ रोजी ०१.०० वा. चे सुमारास राहते घरी इमारतीचे दुसरे माळयावरुन पार्कीगमध्ये उडी घेऊन आत्महत्या केली होती. पोलीस ठाणे बजाजनगर येथे अकस्मात मृत्युची नोंद घेण्यात आली होती. अकस्मात मृत्युचे चौकशीत तसेच, फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे मसपोनि जयश्री गिरे यांनी आरोपी विरूध्द कलम १०८ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्र. ८, नागपुर. | ३०३२७७ /२०१० | कलम ३५३ भादंवि. | राजू नामदेवराव वानखेडे वय ४२ वर्ष रा. शिवाजीनगर गेट जवळ, कोतवाली, नागपूर | २१.०४.२०२६ |
| २. | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर व प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०४५४६ /२००७ | कलम ३७९ भादंवि | ईश्वरदयाल बुधाजी तुरकर रा. इंदीरानगर, वार्ड क्र. ४, खापरखेडा, नागपूर | २०.०४.२०२६ |

स्वा/—

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**